# All India Council for Technical Education

**(A Statutory body under Ministry of Education, Govt. of India)**

Nelson Mandela Marg,Vasant Kunj, New Delhi-110070 Website: www.aicte-india.org

## APPROVAL PROCESS 2023-24

## Letter of Approval (LoA)

F.No. Western /2023-24/1-43374324373 Date: 23-Jun-2023

To,
The Chairman
JAIHIND COMPREHENSIVE EDUCATIONAL INSTITUTE
NARAYANGAON, TAL. JUNNAR, DIST. PUNE,
JUNNAR,PUNE
Maharashtra,410502

**Sub: Letter of Approval for New Institution 2023-24**

Sir/Madam,

In terms of the provisions under the All India Council for In terms of the provisions under the All India Council for Technical Education (Grant of Approvals for Technical Institutions) Regulations, 2020 notified by the Council vide notification number F. No. AB/AICTE/REG/2020 dated 4th February, 2020 and amended on 24th February 2021 and norms, standards, procedure and conditions prescribed by the Council from time to time, I am directed to convey the approval to

| Permanent Id | 1-43374324373 | Application Id | 1-43374324373 |
|---|---|---|---|
| Name of the Institute | JAIHIND INSTITUTE OF MANAGEMENT AND RESEARCH | Name of the Society/ Trust/ Company | JAIHIND COMPREHENSIVE EDUCATIONAL INSTITUTE |
| Institute Address | G.NO. 657, 660(2), VADGAON SAHANI, TAL. JUNNAR, DIST. PUNE, JUNNAR, PUNE, Maharashtra, 412401 | Society/ Trust/ Company Address | NARAYANGAON, TAL. JUNNAR, DIST. PUNE, JUNNAR,PUNE Maharashtra,410502 |
| Institute Type | Private-Self Financing | Region | Western |

**For conduct of the following Courses with the Intake indicate below for the Academic Year 2023-24***

| Sr. No. | Level | Program | Course | Affiliating University/ Board | Intake Approved for 2023-24 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | POST GRADUATE | MANAGEMENT | MBA | Savitribai Phule Pune University, Pune | 120 |

1. The management shall provide adequate funds for development of infrastructural, instructional and other facilities as per norms and standards laid down by the Council from time to time and for meeting recurring expenditure.
2. The Eligibility Criteria for admissions shall be made in accordance with the regulations notified by the Council from time to time.
3. The tuition and other fees shall be charged as prescribed by the Competent Authority within the overall criteria prescribed by the Council from time to time. No capitation fee shall be charged from the students/ guardians of students in any form. If found so, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution
4. The management of the Institution shall not discontinue any course(s) or start any new course(s) or alter intake capacity of seats without the prior approval of the Council.
5. No excess admission shall be made by the Institution over and above the approved intake under any circumstances. In case any excess admission is reported to the Council, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution.
6. The Institution shall not have any collaborative arrangements with any other Indian and / or Foreign Universities for conduct of technical courses without obtaining prior approval from AICTE. In case any violation is reported to the Council, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution
7. The Institution shall not conduct any course(s) as specified in the Approval Process Handbook without prior permission / approval of AICTE. If found so, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution.
8. The Institution shall operate only from the approved location, and that the institution shall not open any off campus study centers / extension centers directly or in collaboration with any other institution / university / organization for the purpose of imparting technical education without obtaining prior approval from the AICTE. If found so, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution.
9. The accounts of the Institution shall be audited annually by a certified Chartered Accountant and shall be open for inspection by the Council or persons authorized by it.
10. Heads of Departments, the teaching and other staff shall be appointed in given time frame and selection shall be done according to procedures, qualifications and experience prescribed by the Council from time to time and pay scales are as per the norms prescribed by the AICTE from time to time. The Institution shall publish an information booklet before commencement of the academic year giving details regarding the Institution and courses / programs being conducted, Fees charged and details of infrastructural facilities including faculty etc. in the form of mandatory disclosure. The information booklet may be made available to the stakeholders of the technical education. The mandatory disclosure information, as per directions in the AICTE website / Approval Process Handbook, shall be put on the Institution

Website. The information shall be revised every year with updated information about all aspects of the Institution.

11. It shall be mandatory for the Institution to maintain a Website providing the prescribed information. The Website information must be continuously updated as and when changes take place.
12. If the Institution fails to disclose the information or suppress and / or misrepresent the information, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution.
13. AICTE may also conduct inspections with or without notifying the dates to verify specific complaints, to verify adherence to AICTE norms & standards, and to verify any mis-representation, violation of norms & standards, mal-practices etc.
14. The Institution by virtue of the approval given by Council shall not automatically become claimant to any grant-in-aid from the Central or State Government.
15. In the event of a student / candidate withdrawing before the starting of the course, the wait listed candidates should be given admission against the vacant seat. The entire fee collected from the student, after a deduction of the processing fee of not more than Rs. 1000/- (Rupees one thousand only) shall be refunded and returned by the Institution to the student / candidate withdrawing from the program. It would not be permissible for the Institution to retain the School / Institution Leaving Certificates in original to force retention of admitted students and not to charge fees for the remaining period if a student cancels the admission at any point of time.
16. The Institution shall take appropriate measures for prevention of ragging in any form, in the light of AICTE regulation "Prevention and Prohibition of Ragging in Technical Institutions, Universities including Deemed to Universities imparting technical education" Regulation 2009 (F.No. 37-3/Legal/AICTE/2009 dated 01/07/2009). In case of failure to prevent the instances of ragging by the Institutions, the Council shall take appropriate action as per the notified regulations.
17. It is mandatory to comply all the essential requirements as given in APH 2023-24(Appendix 6)

The Government/ Management of the Institution shall strictly follow further conditions as may be specified by the Council from time to time.The Council may withdraw the approval, in case it observe any violation of the above conditions and/or non- adherence to the norms and standards prescribed by the Council, mis-representation of facts and submitting factually incorrect information to it.

NOTE: If the State Government / UT / DTE / DME has a reservation policy for admission in Technical Education Institutions and the same is applicable to Private & Self-financing Technical Institutions, then the State Government / UT/ DTE / DME shall ensure that 10 % of Reservation for EWS would be operational from the Academic year 2022-23. However, this would not be applicable in the case of Minority Institutions referred to the clause (1) of Article 30 of Constitution of India

**Prof.Rajive Kumar**
**Member Secretary, AICTE**

Copy to:

1. **The Director Of Technical Education**, Maharashtra**

2. **The Registrar**,**
   Savitribai Phule Pune University, Pune

3. **The Principal / Director,**
   JAIHIND INSTITUTE OF MANAGEMENT AND RESEARCH
   G.No. 657, 660(2), Vadgaon Sahani, Tal. Junnar, Dist. Pune,
   Junnar,Pune,
   Maharashtra,412401

4. **Guard File(AICTE)**

---

Note: Validity of the Course details may be verified at http://www.aicte-india.org/

****Copy of this letter will not be communicated through post/email. However, provision is made in the portal for downloading letter through Authorized login credentials allotted to concerned State Secretary/ DTE/Registrar.**

**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता खाजगी विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना विविध मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२३/प्र.क्र.६३/तांशि-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३० जून, २०२३.

**वाचा** : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एनजीसी/अेआयसीटीई-मान्यता/२०२३/५७१, दि.२६.०६.२०२३.

**प्रस्तावना** :- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन राज्यात नविन संस्था सुरू करणे तसेच विद्यमान विनाअनुदानित संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम, प्रवेश क्षमतेत वाढ /घट, अभ्यासक्रम बंद, पीआयओ / एनआरआयच्या जागा, संस्थेच्या नांवात बदल, अभ्यासक्रमाच्या नांवात बदल इ. साठी कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थाना द्यावयाच्या मान्यतेबाबत संचालक, तंत्रशिक्षण यांनी संदर्भाधीन दि.२६.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केले आहे.

संचालक, तंत्रशिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सोबतच्या Annexure - A ते J मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार Annexure - A ते J मधील नमूद संस्थांना प्रचलित अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अर्ज / प्रस्ताव | सहपत्र |
|---|---|---|
| i. | शै.व. २०२३-२४ मध्ये २ अभियांत्रिकी, ४ एमबीए, व २ पीजीडीएम अभ्यासक्रमाच्या अशा एकूण ०८ नवीन विनाअनुदानित संस्थाना मान्यता दिलेली असल्याने सदर संस्थांना शासन मान्यता देण्यात येत आहे. | Annexure A |
| ii. | विद्यमान विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांतील सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, तुकडी पुर्ण करणे, प्रवेश क्षमता पुर्ववत करणे इ. साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिली असल्याने सदर संस्थांना शासन मान्यता देण्यात येत आहे. | Annexure B |
| iii. | विद्यमान विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामध्ये प्रादेशिक भाषेत (मराठी) नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास शासन मान्यता ण्यात येत आहे. . | Annexure C |
| iv. | विद्यमान विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेतील अभ्यासक्रम बंद करणे, तुकडी बंद करणे, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. | Annexure D |

| अ.क्र. | अर्ज / प्रस्ताव | सहपत्र |
|---|---|---|
| v. | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या धोरणानुसार ओसीआय / पीआयओ/ विदेशी / आखाती देशातील भारतीय कामगारांच्या मुलांकरीता [OCI / PIO / Foreign Nationals / Children of Indian Workers in the Gulf Countries] जागा संबंधित अभ्यासक्रमाच्या मंजूर प्रवेश क्षमतेच्या १५ टक्के अधिक असतात. तसेच अनिवासी भारतीयांच्या मुलांकरीता [NRI] साठीच्या जागा हया मंजूर प्रवेश क्षमतेअंतर्गत ५ % आहेत. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून विद्यमान विनाअनुदानित शैक्षणिक संस्थातील अभ्यासक्रमांना ओ सी आय / पी आय ओ/ विदेशी / आखाती देशातील भारतीय कामगारांच्या मुलांकरीता [OCI / PIO / Foreign Nationals / Children of Indian Workers in the Gulf Countries] व अनिवासी भारतीयांच्या मुलांकरीता [NRI] च्या नवीन जागांना व पूर्वीच्या जागांच्या मुदत वाढीस शासन मान्यता देण्यात येत आहे. | Annexure E |
| vi. | विद्यमान विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेतील सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. | Annexure F |
| vii. | विद्यमान विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेच्या नावात बदल करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. | Annexure G |
| viii. | विद्यमान विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेचा पत्ता / ठिकाणात बदल करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. | Annexure H |
| ix. | एन एस क्यु एफ अंतर्गत बी. व्होकेशनल अभ्यासक्रमाचे नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. | Annexure I |
| x. | एन एस क्यु एफ अंतर्गत सध्या सुरू असलेले बी. व्होकेशनल अभ्यासक्रम बंद करणे, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमता कमी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. | Annexure J |

**अटी व शर्ती:-**

१) सदर मान्यता कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित खाजगी संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१०) एकाच व्यवस्थापनाखालील विलीन होणाऱ्या संस्थांमधील अभ्यासक्रमांची प्रस्तुत विलीनीकरणानंतरची प्रवेश क्षमता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता मंजूर केल्याप्रमाणे राहील.

११) ज्या संस्थेतील अभ्यासक्रम बंद होणार आहेत अशा संस्थेकडून शासनाची वसूली अद्यापही थकीत असल्यास त्याचा भरणा करणे संस्था प्रमुखांवर बंधनकारक राहील.

१२) संस्थेमध्ये सदर अभ्यासक्रम राबविण्यासाठी आवश्यक स्थावर जंगम मालमत्तेविषयी या संस्थेने शासनाकडून किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतले असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची परतफेड करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

१३) संस्थेतील संबंधीत अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बंद करताना त्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना व माजी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याची व परीक्षेस बसण्याची व्यवस्था करणे संस्थेवर बंधनकारक राहील. संस्थेने या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून न दिल्यास, संस्थेविरूध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल व शासनाकडे ठेवलेली संचित ठेव शासन जमा करण्यात येईल.

१४) संबंधीत बंद होणाऱ्या अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या संस्थेतील शिक्षक व कर्मचारी यांना नियमानुसार देय असलेले वेतन, वेतन भरपाई व अन्य आर्थिक प्रदानांचे भुगतान करणे संस्थेस बंधनकारक राहील.

१५) बी.व्होक. अभ्यासक्रमांसदर्भात कम्युनिटी कॉलेज योजनेंतर्गत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी B.Voc.(NSQF Level VII) पदवी अभ्यासक्रम राबविण्यासाठी तयार केलेले विशेष नियम, अटी व शर्तीचे पालन करणे संबंधित संस्थेस व स्कील नॉलेज प्रोव्हायडर यांना बंधनकारक राहील.

१६) बी.व्होक. अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/ संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

१७) बी.व्होक. अभ्यासक्रमाचे प्रवेश हे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद ,नवी दिल्ली यांनी त्यांच्या अप्रॅुव्हल प्रोसेस हॅण्डबुक २०२३-२४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संस्थास्तरावर करावेत.

१८) बी.व्होक. अभ्यासक्रमाच्या मुदतवाढीस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता घेण्याची कार्यवाही संस्थेने नियमाप्रमाणे करावी.

१९) बी.व्होक. अभ्यासक्रम कम्युनिटी कॉलेज योजनेंतर्गत राबविण्यात येत असल्याने व विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्थास्तरावर होत असल्याने सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती सर्व संस्थांना लागू राहतील.

३. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये या शासन मान्यतेनुसार अभ्यासक्रमाचा समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश पुढील १५ दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०६३०१३५६१४७७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अनिल काटकर)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
९. निवड नस्ती/तांशि-४.

Annexure A

Higher and Technical Education Department Government Resolution No.Manyata-2023/C.R.63/TE-4, Dated- 30th June, 2023.

List of New Institute [Approved by AICTE A.Y. 2023-24]

| Sr, No. | Current Application Number | Permanent Id | Institute Name & Address | District | Organisation(Trust) Address | Minority Institute | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2022-23 | Intake Approved for 2023-24 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1-43379597343 | 1-43379597343 | UNITECH B SCHOOL, SURVEY NO. 138, 1/2, JEEVAN NAGAR, TATHAWADE, PUNE, MAHARASHTRA 411033 | PUNE | FLAT NO 101, SHRI MOTISAGAR APARTMENT, S. NO. 473A, GG THAKKAR ROAD, PUNE | N | MANAGEMENT | NONE | POST GRADUATE DIPLOMA | PGDM | 0 | 60 |
| 2 | 1-43412909483 | 1-43412909483 | SANJIVANI BUSINESS SCHOOL, AT-SAHAJANANDNAGAR, PO-SHINGANAPUR, TAL-KOPARGAON, DIST-AHMEDNAGAR | AHMEDNAGAR | AT-SAHAJANANDNAGAR, PO-SHINGANAPUR, TAL-KOPARGAON, DIST-AHMEDNAGAR | N | MANAGEMENT | NOT APPLICABLE | POST GRADUATE DIPLOMA | PGDM | 0 | 60 |
| 3 | 1-43364466333 | 1-43364466333 | SANJIVANI INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, AT SAHAJANANDNAGAR POST SHINGNAPUR TALUKA KOPARGAON | AHMEDNAGAR | AT SAHAJANANDNAGAR POST SHINGNAPUR TALUKA KOPARGAON DISTRICT AHMEDNAGAR | N | MANAGEMENT | Savitribai Phule Pune University, Pune | POST GRADUATE | MBA | 0 | 120 |
| 4 | 1-43374324373 | 1-43374324373 | JAIHIND INSTITUTE OF MANAGEMENT AND RESEARCH, G.NO. 657, 660(2), VADGAON SAHANI, TAL. JUNNAR, DIST. PUNE | PUNE | NARAYANGAON, TAL. JUNNAR, DIST. PUNE | N | MANAGEMENT | Savitribai Phule Pune University, Pune | POST GRADUATE | MBA | 0 | 120 |
| 5 | 1-43390348917 | 1-43390348917 | SUSHILA SURYAWANSHI MANAGEMENT INSTITUTE OF TECHNOLOGY ADVANCEMENT, SHREE AMBA BUSINESS PARK, SURVEY NO. 71/1 & 82/1,RAHATGAON,AMRAVATI | AMRAVATI | 29, SHIKSHAK COLONY , NEXT TO LIC COLONY, MOTI NAGAR CHOWK AMRAVATI. | N | MANAGEMENT | Sant Gadge Baba Amravati University, Amravati | POST GRADUATE | MBA (HUMAN RESOURCE MANAGEMENT) | 0 | 60 |
| | | | | | | | MANAGEMENT | | POST GRADUATE | MBA (INFORMATION TECHNOLOGY AND SYSTEMS MANAGEMENT) | 0 | 60 |
| | | | | | | | MANAGEMENT | | POST GRADUATE | MBA (MARKETING MANAGEMENT) | 0 | 60 |
| | | | | | | | MANAGEMENT | | POST GRADUATE | MBA (FINANCE) | 0 | 60 |
| | | | | | | | MANAGEMENT | | POST GRADUATE | MBA (BUSINESS ANALYTICS) | 0 | 60 |
| 6 | 1-43385861813 | 1-43385861813 | SHRI SWAMI SAMARTH INSTITUTE OF MANAGEMENT AND TECHNOLOGY, AT-MALWADI, POST- BOTA, TAL-SANGAMNER, DIST-AHMEDNAGAR. 422602 | AHMEDNAGAR. | SHRI BALESHWAR SHAIKSHANIK VA KRISHI VIKAS FOUNDATION, AT/POST- DOLASANE, TAL-SANGAMNER, DIST-AHMEDNAGAR | N | MANAGEMENT | Savitribai Phule Pune University, Pune | POST GRADUATE | MBA | 0 | 120 |
| | | | | | | | MCA | Savitribai Phule Pune University, Pune | POST GRADUATE | MCA | 0 | 120 |

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

Ganeshkhind, Pune - 411007
गणेशखिंड, पुणे - ४११००७

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/९७
Telephone : 020-25621188/97
ईमेल/ Email : affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Cell)
वेबसाइट/ Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्र : सीए/ १६८८ | दिनांक : १३/०७/२०२३

प्रति,
मा. अध्यक्ष/सचिव,
जयहिंद कॉम्प्रेहेन्सिव्ह एज्युकेशनल इन्स्टिटयूट,
मु. पो. नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३–२०२४ साठी नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या नवीन महाविद्यालय/परिसंस्थेच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाबाबत....

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली, यांचे संदर्भ पत्र क्र. वेस्टर्न/२०२३–२४/१–४३३७४३२४३७३, दि. २३ जून, २०२३
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक : मान्यता–२०२३/प्र.क्र.६३/तांशि–४, दिनांक ३० जून, २०२३.

महोदय,

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या सदंर्भिय आदेशान्वये खालील रकान्यात नमूद केलेल्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या आपल्या संस्थेच्या नवीन महाविद्यालय/परिसंस्थेस 'कायम विनाअनुदान तत्वावर' शैक्षणिक वर्ष २०२३–२०२४ साठी मान्यता देण्यात आलेली आहे. प्राप्त आदेशानुसार सदरहू महाविद्यालय/परिसंस्थेस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०८ मधील तरतूदी तसेच उपरोक्त शासन आदेशातील अटी व शर्तीच्या आणि विद्यापीठ अनुदान आयोग/संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ/प्राधिकरण व भारत सरकार, महाराष्ट्र शासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित आणि निर्गमित करण्यात आलेले नियम, आदेश, परिनियम, अध्यादेश इत्यांदीमधील तरतूदींच्या अधीन राहून पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यात येत आहे.

| संबंधित शासन निर्णयातील परिशिष्ट (अ) अ. क्र | महाविद्यालय/परिसंस्थेचे नाव व ठिकाण | विद्याशाखा : वाणिज्य व व्यवस्थापन | विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| ४ | जयहिंद इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, गट क्र. ६५७, ६६०(२), वडगांव सहाणी, ता. जुन्नर, जि. पुणे | अभ्यासक्रम : MBA | १२० (Div. No. 1 Div. No. 2)) |

2023-24

Scanned with AltaScanner

आपणांस पुढे असेही कळविण्यात येते की, उपरोक्त अभ्यासक्रमास आवश्यक अर्हताधारक संचालक—शारीरिक शिक्षण, ग्रंथपाल, अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी यांची नियुक्ती करणे तसेच आवश्यक ते निधी स्थापित करणे व ठेवणे आपल्या संस्थेवर/महाविद्यालय/परिसंस्थेवर बंधनकारक राहील.

उक्त रकान्यात नमूद अभ्यासक्रमांबाबत संलग्नीकरणाचे नूतनीकरण/नैसर्गिकवाढ संदर्भातील प्रस्ताव हे **दिनांक ३० सप्टेंबर, पूर्वी** सादर करणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आपला,
13/7/2023
(स. द. डावखर)
उपकुलसचिव

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१) मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई—४०००३२.
२) मा. सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई—४०००३२.
३) मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय विस्तार भवन, मुंबई—४०००३२
४) मा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन, पत्र पेटी क्र. १९६७, ३, महापालिका मार्ग, एल्फिस्टन रोड टेक्निकल हायस्कूल बिल्डिंग, मुंबई — ४००००१
५) मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, ४१२—ई, शिवाजीनगर, पुणे — ४११०१६.
६) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७.
७) मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७.
८) उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७.
९) उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७.
१०) उपकुलसचिव, परीक्षा विभाग — १ व २ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७.
११) उपकुलसचिव, नियोजन व विकास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७.
१२) उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७.
१३) सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग, व्यवस्थापन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११ ००७.
१४) उपकुलसचिव, अंतर्गत गुणवत्ता व सिद्धता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७.
१५) सहायक कुलसचिव, आरक्षण कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७.
१५) कक्षाधिकारी, परीक्षा समन्वय विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७.
१६) कक्षाधिकारी, डाटा प्रोसेसिंग युनिट, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७.



Scanned with AltaScanner

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२,
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/मान्यता-विकापु/अेआयसीटीई/२३-२४/८०९ दिनांक: 9 OCT 2023

कार्यालयीन आदेश :

विषय : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर नवीन संस्था सुरू करणे, विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढीसाठी मान्यतेबाबत......

संदर्भ : १) शासन निर्णय क. मान्यता- २०२३/प्र.क्र.६३/तांशि ४, दि.३०.०६.२०२३
२) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ६३/तांशि-४, दि. ०७.०७.२०२३
३) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ६३/तांशि-४, दि. १९.०७.२०२३
३) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ६३/तांशि-४, दि. ०७.०८.२०२३

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भीन शासन निर्णयान्वये सोबतच्या **"विवरणपत्र अ"** मध्ये नवीन संस्था व **"विवरणपत्र ब"** मध्ये विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर विहित अटींच्या अधिन राहून सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार **तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे** यांचे कार्यक्षेत्रात येणा-या सोबतच्या **विवरणपत्र "अ" व "ब"** मधील संस्थांनी संदर्भीन शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेबाबतची कागदपत्रे या संचालनालयास उपलब्ध करुन दिली आहेत. संबंधित संस्थांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती यांचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये निर्धारीत संयुक्त खात्यात १० वर्ष मुदतीची मुदतठेव व निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क इ. बाबतची कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच संबंधित विद्यापीठ / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता संलग्नता / तात्पुरती संलग्नता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भीन शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सोबतच्या **"विवरणपत्र अ"** मध्ये दर्शविलेल्या नवीन संस्थेतील अभ्यासक्रमांना व **"विवरणपत्र ब"** मध्ये दर्शविलेल्या विद्यमान संस्थेतील नवीन अभ्यासक्रमास व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमता वाढीसह या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर अनिवार्य बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करतील. तसेच संचालनालयाने निर्देशित केलेली माहिती संस्थांना संचालनालयामार्फत विकसीत केलेल्या प्रवेश क्षमता मान्यतेच्या पोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य राहील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व या संचालनालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली, यांना राहतील.

५. शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये ज्या बाबींसाठी दुस-या वर्षासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव विहित केलेली आहे, अशा बाबींसाठी संबंधित संस्थांनी दुसरे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापुर्वी संस्थेचे अध्यक्ष / सचिव व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त नांवे १० वर्षासाठीची मुदतठेवीची पावती पडताळणीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

६. ज्या सस्थांच्या अभ्यासक्रमांना संबंधित विद्यापीठाने संलग्नता अटी व शर्तींच्या अधिन राहून प्रदान केली असल्यास संलग्नतेच्या आदेशातील अटी व शर्तींची पुर्तता संबंधित संस्थांना करणे बंधनकारक राहील. तसेच संबंधित संस्थांना विद्यापीठ / मंडळाच्या नियमांप्रमाणे नियमित संलग्नता घेणे बंधनकारक राहील.

७. सक्षम प्राधकि-याच्या मान्यतेचे आग प्रतिबंधक प्रमाणपत्र असणे व या प्रमाणपत्राचे वेळोवेळी नुतनीकरण करणे अनिवार्य राहील.

८. विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी / कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद / शासन / विद्यापीठ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व या व्यतिरीक्त वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे विवरणपत्र “अ” व “ब” मधील संस्थांना बंधनकारक राहील.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायर मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ / शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर / पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर / डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४. संबंधित संस्था
५. कार्यासन क्र. २ अ व ३ मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्तीस.

E:\Vijay\Approval Process\2023\Final Order\Aicte\Pune.Docx

Annexure A

Directorate of Technical Education, M.S. Mumbai - Office Order No. 2/NGC/MANYATA-RONA/PCI/23-24/899 Dated 9 /10/2023

List of New Institute [Approved by AICTE Government of Maharashtra A.Y. 2023-24]

| Sr, No. | Current Application Number | Permanent Id | DTE Code | Institute Name & Address | District | Government Resolution No. and Date | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2022-23 | Intake Approved for 2023-24 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1-43379597343 | 1-43379597343 | 6993 | UNITECH B SCHOOL, SURVEY NO. 138, 1/2, JEEVAN NAGAR, TATHAWADE, PUNE, MAHARASHTRA 411033 | PUNE | Government Resolution No.Manyata-2023/C.R.63/TE-4, Dated-30th June, 2023 | MANAGEMENT | NONE | POST GRADUATE DIPLOMA | PGDM | 0 | 60 |
| 2 | 1-43374324373 | 1-43374324373 | 6990 | JAIHIND INSTITUTE OF MANAGEMENT AND RESEARCH, G.NO. 657, 660(2), VADGAON SAHANI, TAL. JUNNAR, DIST. PUNE - 412 401 | PUNE | Government Resolution No.Manyata-2023/C.R.63/TE-4, Dated-30th June, 2023 | MANAGEMENT | Savitribai Phule Pune University, Pune | POST GRADUATE | MBA | 0 | 120 |
| 3 | 1-43453343385 | 1-43453343385 | 6995 | ISBM SCHOOL OF COMMUNICATION AND MEDIA MANAGEMENT, 44/1, 44/1/2, VILLAGE NANDE, PASHAN SUS ROAD TALUKA MULSHI,Pune - 412 115 | PUNE | G.R.No.Manyata-2023/C.R.63/TE-4, Dated-7th July, 2023 | MANAGEMENT | None | POST GRADUATE DIPLOMA | PGDM | 0 | 120 |

OFFICE OF THE DIRECTORATE OF TECH. EDN. M.S., MUMBAI

(Dr. Vinod Mohitkar)
Director,
Technical Education, M.S., Mumbai